**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/ २१३९ /२०२१ दि. १४, ऑगस्ट, २०२१

प्रति,

१. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.

२. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि शैक्षणिक विभागांचे प्रमुख.

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील उन्हाळी परीक्षेपासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी फेरपरीक्षेचे आयोजन करणेबाबत.

**संदर्भ:-** (१) विद्यापीठाचे पत्र जा.क्र.उमवि/७-अ/अं.मू. प्रात्यक्षिक गुण/१०१०/२०२१, दि.१०/०३/२०२१
(२) मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/२०२१/सर्व विद्यापीठ/ विशि-१/८६३१A,दि.०१.०८.२०२१
(३) मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली सर्व विद्यापीठांच्या कुलगुरू समवेत दि.०४.०८.२०२१ रोजी दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित बैठकीचे इतिवृत्त
(४) मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,पुणे यांचे पत्र क्र.युएनआय (८२/२१)विशि-१/ ८८६९, दि.०९.०८.२०२१

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भीय पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्यातील अतिवृष्टी, पूरपरिस्थिती तसेच परीक्षार्थी कोविड रूग्ण असल्यास किंवा कुटूंबातील सदस्य कोविडग्रस्त असल्याने परीक्षार्थी विलगीकरणात असल्यामुळे कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. यासाठी आवश्यकतेनुसार पुनर्परीक्षेचे आयोजन करण्यात यावे, असे शासनाचे निर्देश आहेत.

तसेच काही विद्यार्थ्यांना किंवा त्यांच्या कुटूंबातील सदस्यांना कोवीड-१९ चा प्रादूर्भाव झाल्याने, काही विद्यार्थ्यांचे पालकांचे कोवीड-१९ मुळे निधन झाल्याने विद्यार्थ्यास विलगीकरण कक्षात राहावे लागले, तसेच ऑनलाईन परीक्षा सुरु असतांना इंटरनेट, विज पुरवठा व इतर तांत्रिक अडचणी उद्‌भवल्यामुळे विद्यापीठाच्या बहिस्थ लेखी परीक्षा व बहिस्थ प्रात्यक्षिक परीक्षेपासून विद्यार्थी वंचित राहिल्याने अशा विद्यार्थ्यांची फेर परीक्षा घेण्याबाबत विविध विद्यार्थी व विद्यार्थी संघटनांनी विद्यापीठास विनंती केलेली आहे.

...२

वरीलप्रमाणे शासनाकडून प्राप्त निर्देश व विद्यार्थी व विद्यार्थी संघटनांची प्राप्त निवेदने व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता, मा.विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने प्राप्त आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठाद्वारा शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील दिनांक ८ जून,२०२१ पासून ते दि.३१ जुलै,२०२१ पावेतो झालेल्या (उन्हाळी) ज्या परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत. (शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या परीक्षा वगळता) त्या बहिस्थ लेखी व बहिस्थ प्रात्यक्षिक परीक्षांना अनुपस्थित किंवा अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी फेर परीक्षेचे आयोजन करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला असून, अशा विद्यार्थ्यांच्या **बहिस्थ लेखी परीक्षा दि.२३, २४ व २५ ऑगस्ट, २०२१ या कालावधीत (सकाळी १० ते सायंकाळी ६ या दरम्यान) ऑनलाईन पध्दतीने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (MCQ) स्वरुपात Smartphone/ Laptop/ Desktop with web camera याद्वारे घेण्यात येणार आहेत.** विद्यार्थ्यांनी या कालावधीत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या **https://nmu.unionline.in** या लिंकवर जाऊन परीक्षा द्यावयाची आहे.

तसेच वरील कालावधीतील बहिस्थ लेखी परीक्षांमधील जे विद्यार्थी **बहिस्थ प्रात्यक्षिक परीक्षांना अनुपस्थित राहिले किंवा अनुत्तीर्ण झाले अशा विद्यार्थ्यांसाठी, विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रत्यक्ष न बोलाविता संदर्भ पत्र क्र.(१) मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक सुचना नुसार बहिस्थ प्रात्यक्षिक परीक्षांचे आयोजन महाविद्यालय स्तरावर ऑनलाईन पध्दतीने दि.२१ ऑगस्ट,२०२१ पर्यंत करण्यात यावे.** अशा विद्यार्थ्यांच्या बहि:स्थ प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण विद्यापीठास दि.२३ ऑगस्ट,२०२१ पावेतो विहित नमुन्यात **'परिशिष्ट-ब'** सादर करुन, विद्यापीठास सहकार्य करावे.

**दिनांक ८ जून, २०२१ पासून ते दि.३१ जुलै, २०२१ पावेतो झालेल्या (उन्हाळी) परीक्षांसाठी परीक्षा अर्ज सादर केलेल्या (बहिस्थ लेखी व बहिस्थ प्रात्यक्षिक परीक्षांना अनुपस्थित किंवा अनुत्तीर्ण झालेल्या) विद्यार्थ्यांनाच वरील परीक्षेस प्रविष्ठ होता येईल. इतर विद्यार्थी या परीक्षेस प्रविष्ठ झाल्यास, त्यांचे गुण ग्राह्य धरले जाणार नाहीत.**

सदर बाब विद्यार्थी व सर्व संबंधित घटकांच्या निदर्शनास आणून देऊन परीक्षा सुरळितपणे पार पाडण्यासाठी विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासु,

(प्रा. किशोर फ. पवार)
प्र. संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव अग्रेषित-**

१) मा.कुलगुरू कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव २) मा.प्र-कुलगुरू कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
३) मा.प्र-कुलसचिव कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव ४)मा.प्र.वित्त व लेखा अधिकारी,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव-**

१) उपकुलसचिव,परीक्षा व मूल्यमापन मंडळ, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
२) यंत्रणा विश्लेषक,संगणक केंद्र,परीक्षा व मूल्यमापन विभाग, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
३) प्र.सहायक कुलसचिव,(गोपनीय पूर्वार्ध) परीक्षा व मूल्यमापन मंडळ ,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
४) विशेष कार्य अधिकारी (संगणक केंद्र),परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
५) परीक्षा व मूल्यमापन विभागातील सर्व उपविभागांचे प्रमुख/नियंत्रक अधिकारी ,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
६) समन्वयक, एम.के.सी.एल., कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
७) जनसंपर्क अधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव : **कृपया, वरील परीक्षेबाबत विद्यापीठ कार्यक्षेत्रातील वृत्तपत्रात बातमी रूपात प्रसिध्दी द्यावी.**